RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On:12 July 2015 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 July, 2015

# अजायब ✸ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : तेरा | अंक : पहिला | जुलै २०१५




| | |
|---|---|
| कौन कहे मै मर जाणा है (भजन) | 4 |
| प्रश्नोत्तरे | 5 |
| संत सहज सुख दाता (सत्संग) | 15 |
| शिस्त (संदेश) | 25 |


मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई – 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

# कौन कहे मैं मर जाणा है



कौन कहे मैं मर जाणा है,
मैं तां कृपाल घर जाणा है,

लम्मां चौड़ा सागर जेहड़ा,
होले-होले तर जाणा है,

जीवन दी राह विच आई,
मौत मोई ने मर जाणा है,

जीवन दे नक्शे अन्दर,
रंग सावन दा भर जाणा है,

वड्डी सारी उमरां भोगी,
रहना नहीं ऐं घर जाणा है,

कृपाल दी चर्चा होंणी है,
जा जीन्नां नाम जप जाणा है,

कोई मेरा राह ना रोके,
जाणा है सचमुच जाणा है,

तोरो[१] मैनूं हसके तोरो,
अपने ही मैं घर जाणा है,

जद वी चाहेगा 'अजायब'
खाली पिंजर[२] कर जाणा है,

कठीण शब्दांचा भावार्थ:
१. तोरो : निरोप द्या
२. पिंजर : देह रुपी पिंजरा

# प्रश्नोत्तरे

परम संत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे
सांपला, हरियाणा – २१ मार्च १९९७

***एक प्रेमी :*** *प्रिय संतजी! अलिकडे असे काही संदेश मिळाले आहेत, ज्यामध्ये असा उल्लेख आहे की मृत्युरूपी बहिरी ससाणा (मृत्युरूपी शिकारी) आपणांवर झड़प घालून कधी घेऊन जाईल याची आपणांस कल्पना नाही! व आपणांस अशी संधी पुन्हा कधी लाभेल याचीही आपणांस कल्पना नाही! अनेक सेवकांनी याचा असा अर्थ करून घेतला की आपण आम्हांस जागृत करण्याचा प्रयत्न करीत आहात, जेणेकरून आम्ही जास्तीत जास्त ध्यान–अभ्यास करू लागावे, जास्त वेळ गुरुंच्या मधुर आठवणीत व्यतीत करावा आणि (आत्मनिरीक्षणासाठी दिलेल्या) डायरीचा वापर करून स्वत:चे जीवन सुधारावे. परंतु काही प्रेमी चिंताग्रस्त झाले आहेत, ज्यांनी याचा असा अर्थ करून घेतला की आपण (संतजी) लवकरच या इहलोकातून निघून जाणार आहात. त्यांनी याबाबतीत इतर लोकांना देखील सांगितले, त्यानंतर यासंबंधी जगभर अफवा पसरण्यास सुरुवात झाली आहे. इतरही काही सेवक अशा प्रकारची चर्चा करीत आहेत की आम्हा सेवकांनी काय करावे जेणेकरून तुमच्यावरील दु:ख आम्ही स्वत:वर घेऊ शकू व तुमच्यावरील त्या दु:खाचे ओझे कमी होईल. कृपा करून आपण आम्हांस सांगाल की आम्ही त्या संदेशाचा खरा अर्थ काय समजावा? आणि या स्थितीत आम्हा सेवकांनी कशा प्रकारे प्रेम व आदरभरीत तसेच मदत करणारे आचरण करावे?*

**बाबाजी :** प्रिय बंधुंनो! खूप चांगला प्रश्न आहे. सर्व संतांनी जी भावना नजरेसमोर ठेवून सांगितले आहे, तीच भावना डोळ्यांसमोर ठेवून मी आपणांस सांगत आहे. प्रिय मुलांनो! मी तुम्हांस कोणतीही नवीन गोष्ट सांगण्यासाठी आलेलो नाही. गुरु तेगबहादुजी सांगतात:

***बाल जवानी और वृद्धपन तीन अवस्था जान। इनमें कोई साचो नहीं नानक सांची मान।।***

बालपणानंतर आपण तारुण्यावस्थेमध्ये प्रवेश करतो. तरुणपणी आपण पुन्हा बाल्यावस्थेमध्ये जाण्याचा विचार केला तर तो फक्त विचारच राहतो, कारण आपण पुन्हा बालक बनू शकत नाही. याचप्रमाणे आपण विचार केला की आपण कायमचे तरुण राहावे, तर आपण सदैव तरुण राहू शकत नाही. अखेरीस वृद्धापकाळही येतो. गुरु अर्जुन देवजी महाराज सांगतात:

***राम गयो रावण गयो जाकों बहो परिवार। कहो नानक थिर कछु नहीं सुपने ज्यों संसार।।***

ब्रह्मचा अवतार राम होता, जो आज अस्तित्वात नाही. वेद–शास्त्रांमध्ये उल्लेख आहे की विज्ञानात खूप प्रगती केलेला रावण, ज्याचे खूप मोठे कुटुंब होते तो देखील राहिला नाही. ज्याप्रमाणे रात्री स्वप्न पडले तर ते झोपेत असेपर्यंत सत्य वाटते, परंतु जागृत झाल्यावर समोर काहीच नसते; त्याचप्रमाणे या इहलोकामधील आपले जगणे हे एखाद्या स्वप्नाप्रमाणेच असते.

गुरू अर्जुनदेवजी सांगतात,''आपण मुर्ख आहोत, स्वप्न मायाजाळासमान असूनही आपण त्यामध्ये मन गुंतवलेले आहे. जी कामे आपण आयुष्यभर करीत असतो, ती (अंतसमयी) अपूर्णच आहेत, पूर्ण नाहीत. परमात्म्यास प्राप्त करणे हे पूर्ण काम आहे, परंतु आपण त्यास विसरून जातो.'' कबीर साहेब सांगतात,''फांदीवरील तुटलेल्या पानास, वारा उडवून दूरवर नेतो. ते पान पुन्हा फांदीस जोडले जाऊ शकत नाही.''

काही लोक एक पार्थिव शरीर घेऊन चालले होते. गुरू नानकदेवजी महाराज त्यांस पाहून आपणांस जागृत करीत आहेत:

***जागो जागो सुत्तयो चलया बणजारा।***

आपण सांगत आहात,''हे पहा! हा (इहलोक सोडून) जात आहे, तुम्ही जागृत व्हा.'' युधिष्ठराने यक्षास विचारले की,''या जगामध्ये सर्वात अद्‌भुत व विचित्र गोष्ट कोणती आहे?'' यक्ष म्हणाला, ''आपण आपल्या नेत्रांनी लोकांना ही इहलोकाची यात्रा संपवून जाताना पाहतो, त्यांना आपण आपल्या

खांद्यावरून स्मशानापर्यंत देखील नेतो, परंतु आपण ती घटका विसरून जातो व असे समजतो की आपणांस कधी मृत्यु येणार नाही, आपण या जगात कायमचे राहणार आहोत.'' सुफी संत फरीदसाहेब सांगतात:

***मैं जाणया दुख मुझको दुख सवाया जग।***
***ऊँचे चढ़के देखया घर घर ऐहो अग।।***

आपण सांगता,''मला असे वाटत होते की, जन्म-मरणाचे दु:ख केवळ मलाच भोगावे लागणार आहे. जेव्हा मी माझ्या सतगुरुंनी सांगितल्याप्रमाणे नामस्मरण केले, तिसऱ्या तिळावर एकाग्र झालो, आत्म्यावरील तीन्ही पडदे दूर सारून परब्रह्ममध्ये पोहचलो, तेथून प्रगती करीत भंवरगुफा, सच्चखंडामध्ये पोहचलो, तेव्हा मी पाहिले की, जन्म-मरणाचे दु:ख मलाच नाही तर त्या दु:खाने सर्व जगास पछाडलेले आहे. फक्त परमात्माच या जन्म-मरणाच्या दु:खमय फेऱ्यामध्ये अडकलेला नाही.''

***दरिया कन्ने बगुला बैठा केल करे। केल करेन्दे हंज नूं अचन्तों बाज परे।***
***बाज पए तिस रब दे केलां विसरियां। जो मन चित्त न चेत सहंसो गल्ली रब कीयां।।***

नदी किनारी बसून एक बगळा वेगवेगळे खेळ करीत होता. तो पाण्यातील किड्यांना चोचीने पकडून वर हवेमध्ये उडवीत होता व पुन्हा त्यांना चोचीने झेलून गिळंकृत करीत होता. परंतु त्यास कल्पना नव्हती की मृत्युरूपी ससाणा त्यासदेखील अशाचप्रकारे पकडेल. मृत्युरूपी ससाणा समोर आल्यावर तो बगळा स्वत: करीत असलेले खेळ विसरून गेला. तो मृत्युरूपी ससाणा कोणतीही पुर्वकल्पना न देता अचानकच समोर उभा ठाकला होता.

प्रियजनहो! प्रत्येकजण संसारिक वस्तुंची आठवण ठेवतो. मृत्युची कोण आठवण ठेवतो? परंतु वेळ आल्यावर मृत्यु येऊन समोर उभा राहतोच. आपण आठवण ठेवा किंवा नका ठेवू मृत्युदेव यम मात्र वेळेचे बरोबर पालन करतो. त्यास कोणत्याही प्रकारची लालुच देऊन अथवा सत्तेच्या बळावर कोणी टाळू शकत नाही. सुनिश्चित वेळी तो नेमका समोर उभा ठाकतो.

***दो दीवे बलेंदया मलक बैठा आए। गढ़ लीता घट लुटया दीवणे गया बुझाए।।***

यम येऊन शरीराचा ताबा घेतो. ज्यास नेण्यासाठी तो आलेला असतो, त्या व्यक्तीसच तो दिसतो. नेत्रांमधील तेज नष्ट करून तो त्यास सोबत घेऊन जातो. आयुष्यभर आपल्यावर जीवदान देण्यासाठी तयार असणारा आपला मित्र–परिवार आपली कोणत्याही प्रकारे मदत करू शकत नाही, ना त्यांच्यामध्ये मदत करण्याची शक्ती असते. प्रिय मित्रहो! जास्तीत जास्त ते केवळ रडण्याचेच काम करू शकतात.

हिंदुस्थानात राजांची राज्ये खूप शक्तीशाली होती. मी माझ्या आयुष्यात, माझ्या नेत्रांनी तीन राजांचा मृत्यु पाहिला आहे. त्यांच्या आजुबाजूस शेकडो सैनिक पहारा देत होते. परंतु मृत्युदेवता कोठून आला व आत्म्यास घेऊन कसा गेला हे कोणत्याही सैनिकाच्या लक्षात आले नाही. त्या राजांच्या शरीराचे मूठभर राखेमध्ये रूपांतर करण्यात आले.

प्रियजनहो! कपूरथला राज्यास जगाचे पॅरीस असे संबोधले जात असे. तेथील राजाच्या शरीराची काही वेळातच आम्ही राख करून आलो होतो. त्यावेळी मी स्वत: रविदासजींची वाणी म्हटली होती:

***जो दिन आवे सो दिन जाही, करना कूच रहन थिर नाहीं।***

जो मनुष्य या जगात जन्म घेतो, त्यास एके दिवशी हे जग सोडून जावेच लागते. आपण येथे कायमस्वरूपी वास्तव्यासाठी आलेलो नाहीत. दोन–तीन वर्षे होऊन गेली, आम्ही कुलु–मनालीहून परत येत होतो. मी सैन्यात असताना ज्या ज्या ठिकाणी राहत होतो, ती सर्व ठिकाणे येताना मी गुरुमेलला दाखवित आलो. मी शिकत होतो ती शाळादेखील दाखविली. तो राजमहाल आजदेखील विराण अवस्थेत पडून आहे, तेथे कोणी पहारेकरीही नाही, जेथे एकेकाळी राजे रहात होते. कबीर साहेब सांगतात:

***आसी पासी योद्धे खड़े सभी बजावें गाल।***
***मंज महल्लो लै गया ऐसा काल कराल।।***

जेव्हा कोणी मोठा मनुष्य मरण पावतो, तेव्हा त्यास आपण सलामी देतो, श्रद्धांजली अर्पण करतो, जो केवळ लोकांसाठी केलेला देखावा आहे. आपणांस तर कल्पनादेखील नसते की, त्या आत्म्याच्या कर्मांनुसार काळ भगवान त्या आत्म्याची काय अवस्था करणार आहे?

माझ्या सतगुरुंनी मला वैयक्तिकरित्या सांगितले होते की, हे बघ! आपण येथे कायम वास्तव्य करण्यासाठी आलेलो नाहीत. निघून गेलेली वेळ पुन्हा आपल्या हाती येणार नाही. तुम्ही भजनांतही वाचता:

***बीतया वेला हत्थ न आवे, अजायब नू कृपाल समझावे।***

प्रियजनहो! मृत्युस तेच लोक घाबरतात, ज्यांनी मृत्यु पाहिलेला नसतो. जर त्यांच्यासमोर कुणी मृत्युचे नांवदेखील घेतले, तरीदेखील ते घाबरतात व म्हणतात की, माझ्यासमोर मृत्युचे नावदेखील काढू नकोस, इतरांना तू मृत्युविषयी सांग. संत कधी मरण पावत नाहीत, तर ते स्वगृही परत जातात. शरीर जन्म घेते आणि मृत्यु पावते. परंतु संतांच्या अंतरात कार्यरत असलेली शक्ती ना जन्मते, ना मरण पावते; ना येते ना जाते.

तुम्हांस असे वाटते काय की परमात्मा सावन वा कृपाल मरण पावले आहेत? नाही! ते आजदेखील जीवित आहेत, या जन्मापूर्वीही जीवित होते, तसेच पुढेदेखील ते जीवित राहणार आहेत. ते संसारातील हजारो-लाखों जीवांना जीवनदान देतात. गुरू नानकदेवजी सांगतात की, परमात्मा निश्चल, अविनाशी आहे. जे स्वत:च्या आत्म्याचे विलय परमात्म्यामध्ये करतात, तेदेखील नाशहीन, अविनाशी बनतात.

सर्व संत या जगात येऊन आपल्या सुप्त आत्म्यांना जागृत करतात. ते सांगतात, ''तुम्ही प्रवाशी असून या जगामध्ये कायमचे वास्तव्य करण्यासाठी आलेला नाहीत. तुम्ही मोहाच्या मधुर निद्रेतून जागृत व्हा. तुम्हांस एक संधी मिळाली असून तुम्ही तुमच्या ध्यान-अभ्यास आणि नामस्मरण या कामांना प्राधान्य द्या. हेच आपले खरे काम आहे.''

मी आपणांस आणखीन बऱ्याच संतांची उदाहरणे देऊ शकतो. प्रत्येक संतांनी मृत्युचा उल्लेख केलेला आहे. त्यांनी हेदेखील सांगितले आहे की, आपली मृत्यु–घंटा कधी व कोठे वाजेल याची आपणांस कल्पना नाही.

आता मुद्दा राहिला त्या लोकांचा जे भविष्यवाण्या करतात. सर्वप्रथम भविष्यवाणी करणाऱ्या प्रेमींचा मी आभारी आहे ज्यांनी माझ्याबद्दल सहानुभूती तसेच माझ्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली. प्रियजनहो! अशी गोष्ट सांगण्या पूर्वी लहान मुलेदेखील विचार करतील की काय ते स्वत: तरी कायम या जगात रहाणार आहेत का जे माझ्या जाण्याची चिंता करीत आहेत? मृत्यु त्यांच्यावरदेखील झडप घालणार आहे. त्यांना यागोष्टीची कल्पना नाही की, ते संतांच्या अगोदर जाणार आहेत की नंतर?

प्रिय मुलांनो! सत्संगींनी स्वत:च्या कर्मांचे ओझे जरी उचलले तरी ते खूप आहे. जे लोक असे म्हणतात की, संतांचे ओझे आम्ही उचलू शकतो, ते भ्रमात आहेत. मी खात्रीने सांगतो की, असे लोक मोठेपणा व प्रशंसेचे भुकलेले असतात. ते लोकांद्वारे वाहवा मिळविण्यासाठीच असे म्हणतात.

मी परमात्मा सावन–कृपालजींच्या कृपेने त्यांना अंतर्यात तसेच बाहेर देखील परमात्मास्वरूपात पाहिले आहे. त्यांनी कधीही कोणाविषयी भविष्यवाणी केली नाही की, अमुक मनुष्य कधी जाणार आहे ना त्यांनी स्वत:विषयी कधी भविष्यवाणी केली की आम्ही जगामधून कधी जाणार आहोत. महाराज सावन सांगत असत की, ''हीन लोकच भविष्यवाण्या करतात. भविष्यवाणींवर आपण कधीही विश्वास ठेवू नये, कारण यामध्ये काहीच सत्य नसते. त्या केवळ लोकांकडून वाहवा मिळविण्यासाठी केल्या जातात.''

महाराज कृपालजींनी अनेक देशांमध्ये सत्संग केले होते. मला घाणा दौऱ्याबद्दल माहीत आहे की, ते घाणा येथे न जाता, त्यांनी त्यांचा विदेशी दौरा अर्धवट सोडून परतले होते. परंतु त्यांनी भविष्यवाणी केली नाही की मी हे जग सोडून जात आहे.

मी अनेक सत्संगांमध्ये सांगितले आहे की, परमात्म्याद्वारे जी काही सुखं-दु:खं संतांच्या वाट्यास येतात, ती भोगताना संत संकोच किंवा टाळाटाळ करीत नाहीत. भले अपघात होणार असेल, ज्यात त्यांचे कितीही नुकसान होणार असेल, जीव जरी जाणार असला तरीही ते ना ती वेळ कधी टाळतात ना त्याबद्दल भविष्यवाणी करतात. ते वाईट न वाटून घेता त्यास परमात्म्याची इच्छा समजतात. ते आपणांस दृढ विश्वास देतात की, त्याप्रमाणे सतगुरू परमात्म्याच्या इच्छेचा आदर करतात, तसा आपण सतगुरूंच्या इच्छेचा आदर केला पाहिजे.

प्रियजनहो! सतगुरू जर अशा भविष्यवाण्या करू लागले, तर जे प्रेमी अंतर्यात जातात व ज्यांना अतुट प्रेमाचे वरदान लाभलेले असते, ते प्रेमी जिवंत राहतील काय? ते हुंदके देत-देत आपला देह त्यागतील. महाराज सावन सिंहजींनी जेव्हा शरीर सोडले त्यावेळी काही लोकांना अशा प्रकारचे अनुभव आले होते. अंदाजे दोनशे प्रेमींनी स्वत:चा देह त्याग केला, काहींनी विहीरीत उड्या मारल्या व काहींनी नदीमध्ये स्वत:स झोकून दिले.

महाराज कृपालजींनी कुणास कळूच दिले नाही की ते कधी देहत्याग करणार आहेत. त्यांचे जेवण बनविणाऱ्या ताईजी देखील भ्रमात होत्या की महाराजजी अगदी धडधाकट आहेत.

प्रियजनहो! संगतमध्ये सर्वचजण भ्याड कोल्ह्यासमान नसतात, तर बहादूर आणि शूरवीर देखील असतात. नेत्र मिटल्यानंतर संगतमधील सर्वच प्रेमी अंधार पाहत नसतात. माझ्या प्रिय मुलांनो! तुमच्या संगतमध्ये असे देखील प्रेमी आहेत जे ध्यान-अभ्यास करीत अंतर्यात जाऊन सतगुरूंना भेटतात. परंतु असे प्रेमी भविष्यवाणी करीत नाहीत. खरेतर अशा लोकांना तुम्ही पारखू शकणार नाही. त्यांच्या अंतरात कमालीची नम्रता असते. तुम्ही त्यांना ओळखूच शकणार नाही की खरोखरच ते अंतर्यात सतगुरूंना प्रगट करू शकतात.

माझ्या प्रिय मुलांनो! ज्यांना मी नाम देतो, त्यांना परमात्मा कृपालजींच्या झोळीत टाकतो. माझे ओझे परमात्मा सावन–कृपालच उचलू शकतात. माझे ओझे उचलू शकणारा एकही मनुष्य नाही. परंतु तुम्ही ध्यान–अभ्यास आणि नामस्मरण केल्यास मला कमी कर्मांचे ओझे उचलावे लागेल, माझी प्रकृती नक्कीच चांगली राहील.

महाराज सावन सिंहजींना त्यांच्या अंतसमयी विचारले गेले की, तुमच्या जन्मपत्रिकेमध्ये तुमचे आयुष्य शंभर वर्षे नमूद केले असूनही तुम्ही आत्ताच जाण्याची तयारी केली आहे. महाराज सावन म्हणाले, ''तुम्ही मला शांतपणे काम करू द्याल, संसारिक गोष्टीविषयी मला पत्रे लिहिली नाहीत, तर मी शंभर वर्षे नक्की पूर्ण करीन. तुम्ही जितके जास्त ध्यान–अभ्यास कराल, तितका अधिक वेळ मी तुमच्या सोबत व्यतीत करीन.'' परंतु ते दहा वर्षे अगोदरच शरीर सोडून गेले. परमात्मा कृपाल संगतला ध्यान–अभ्यास करण्यासाठी बजावत होते की, तुम्ही जोपर्यंत आत्म्यास त्याचे अन्न देत नाही, तोपर्यंत शरीरास अन्न देऊ नका. परंतु महाराज कृपालदेखील चौदा वर्षे अगोदरच या इहलोकातून निघून गेले.

मी प्रश्नकर्त्याचा आभारी आहे, त्याने प्रश्न विचारून चांगले केले. कोणत्याही संतांनी असे म्हटले नाही आपण या जगात कायमचे राहणार आहोत. सर्व संत हेच सांगतात की, हे भरलेले जग आपण एके दिवशी सोडून जाणार आहोत. आपणांस कल्पना नाही की कोणत्याक्षणी आपणांस बोलावणे येईल!

सुथरा एक निर्भिड फकीर होते. ते गुरू हरगोविंदजीं पासून गुरू गोविंद सिंहजींपर्यंत होते. त्यांनी ध्यान–अभ्यासाची खूप साधना केलेली होती; त्यांस परमगती प्राप्त झालेली होती. त्यांच्या हास्यरसाच्या अनेक कविता आपल्याला आढळतात. सुथरा एकदा एका धर्मशाळेत मुक्कामासाठी थांबले होते. तेथे एक नवविवाहित जोडपे आले. संसारिक रिवाज आहे की, अशा ठिकाणी जाऊन आपण मिठाई वाटतो, पैसे ठेऊन नमस्कार करतो.

त्या जोडप्याने सुथरा फकीरासमोर येऊन दोन रुपये आणि मिठाई ठेऊन नमस्कार केला. सुथरेंनी ते रुपये मंदिराच्या पुजाऱ्यास दिले. त्या मंदीराच्या पुजाऱ्याने जोडप्यास आशीर्वाद दिला,''तुम्ही चार युगे जिवंत राहाल.'' जेव्हा ते जोडपे सुथरांचा आशीर्वाद घेऊ लागले, तेव्हा सुथरा फकीर त्या मुलास म्हणाले, तू मरणार आहेस आणि मुलीस म्हणाले, तू देखील मरणार आहेस. ते जोडपे म्हणाले,''फकीरा! तू आम्हांस असा शाप का बरे देत आहेस?'' सुथरा म्हणाले,''हे बघा! प्रत्येकजण मरणार आहे. खोटे बोलणारा पुजारी आहे, जो दोन रुपयांसाठी खोटे बोलत आहे.''

प्रियजनहो! भविष्यवाणी करणारे विसरत आहेत की, आपणदेखील हे जग सोडून जाणार आहोत. एके दिवशी प्रत्येकजण येथून जाणार आहे. मी तुम्हांस नक्कीच सांगेन की अशा भविष्यवाणींवर तुम्ही विश्वास ठेवू नका. विश्वास आणि प्रेमपूर्वक तुम्ही आपले ध्यान-अभ्यास आणि नामस्मरण करावे. जेवढा वेळ मला तुमची सेवा करण्याची संधी लाभली आहे, तेवढा वेळ मी आनंदाने तुमची सेवा करीत आहे. माझा तुम्हाला हाच आग्रह आहे की, तुम्ही जास्तीत जास्त ध्यान-अभ्यास आणि नामस्मरण करावे.

मला सांगण्यास खूप खेद वाटतो की, आश्रमात याविषयी बरीच मोठी तार आली, जी गुरुमेलने वाचली. त्या तारेचा यांच्या अंत:करणावर खूप वाईट परिणाम झाला. माझे अंत:करण खूप उदास झाले. असे काही होणार नाही याची त्यांना खात्री पटविण्यास मला बरेच दिवस लागले. या प्रेमींच्या अंत:करणास ठेच लागली. सर्व संगतवर बराच वाईट परिणाम झाला.

मी अपेक्षा करतो की, अशा प्रेमींनी संगतमध्ये अशी भविष्यवाणी करू नये, आपला ध्यान-अभ्यास व नामस्मरण करावे. आपण आपली कंबर कसून सदैव तयार राहिले पाहिजे व बोलावणे येताच निघण्यात फायदा आहे.

***



# संत सहज सुख दाता

सत्संग: परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरु अर्जुन देवजी महाराजांची वाणी,
घाना, साऊथ आफ्रिका – ३ जून १९९४

परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो जे शब्दरूपाने या विश्वामधील कणा–कणात व्यापलेले आहेत. त्या शक्तीचे शब्दांच्या मदतीने आभार मानले जाऊ शकत नाही. सतगुरुंचे खरे आभार आपण अंतर्यात जाऊन, तेथील सत्याचा अनुभव घेऊनच करू शकतो.

प्रियजनहो! संतांच्या गोष्टी केवळ कागदी (ऐकीवात्य) गोष्टी नसतात. त्या गोष्टींनुसार त्यांनी स्वत:चे जीवन व्यतीत केलेले असते. संत आपल्या प्रिय मुलांना उपदेश करतात की प्रभु परमात्म्यास गोष्टींनी (कथन करून) वा लिहिल्या वाचल्याने प्राप्त केले जाऊ शकत नाही, हा स्वत: (ध्यानअभ्यास) करण्याचा मार्ग आहे. जी परमसंतांची वचने धर्मग्रथांत लिहिलेली आहेत, त्यानुसार स्वत: केल्यानेच आपण सत्य आपल्या नेत्रांनी पाहू शकतो.

महाराज सावन सिंहजी ही गोष्ट सांगत असत की एक राजा शिकारीसाठी जंगलामध्ये गेला. त्याच्यासमोर एक वाघ आला. स्वत:चा जीव वाचविण्यासाठी राजा एका झाडावर चढला. तो झाडावर बसून विचार करू लागला की, मी ज्या फांदीवर बसलेलो आहे ती नक्की मजबूत आहे का? जर मी खाली पडलो, तर खालील जमीन साफ आहे की ओबडधोबड आहे? खाली दगड तर नाहीत? त्याचे फांदीकडे लक्ष गेले असता त्याने पाहिले की फांदीस काळा आणि पांढरा असे दोन उंदीर कुरतडत होते. त्याने खाली पाहता, त्यास असे दिसले की खाली आपला जबड़ा उघडून अजगर बसलेला होता. आता राजास फांदीचीही भीती वाटू लागली की जर ही फांदी तुटली तर मी खाली पडेन व अजगर मला भक्ष्य बनविल. राजाने वर पाहिले असता त्यास तेथे मधाचे मोहोळ लागलेले दिसले. उन्हाळ्याचे दिवस असल्याने त्या

मोहोळातून थेंब–थेंब मध गळत होता. राजाने तोंड वर केले असता, तो मध त्याच्या तोंडामध्ये पडू लागला. तो मध खाण्यात राजा निमग्न झाला. तो फांदी, अजगर आणि वाघाची भीतीदेखील विसरून गेला.

प्रियजनहो! ही केवळ एक गोष्ट आहे. सत्य हे आहे की आपण तो राजा आहोत. काळा व पांढरा उंदीर हे रात्र आणि दिवस आहेत. वाघ म्हणजे यम आहे, जो नेहमी आपल्या प्रतिक्षेत असतो. अजगर म्हणजे आपली कबर आहे जी आ वासून उभी असते, ती नेहमी म्हणत असते की तू लवकर माझ्या आत ये, जेणेकरून मी तुला जखडून टाकीन. मध म्हणजे विषय–विकाररूपी चाटण आहे, ज्यामध्ये आपण निमग्न झालो आहोत.

आपणांस ना यमाची भीती वाटते ना दिवस–रात्रीने घटणाऱ्या आयुष्याची भीती वाटते. जो दिवस आज गेला तो उद्या मिळत नाही, आपण मृत्युस विसरलो आहोत. आपण रात्रं–दिवस विषय–विकारांचे चाटण चाटण्यात निमग्न होऊन आपल्या कबरीच्या भयासही आपण विसरलो आहोत. सुफी संत फरीदसाहेब सांगतात:

***गौर निमाणी सद करे निगरयां घर आओ।***
***सरवर मैथों चलना मरना क्यों डराओ।।***

ज्या आत्म्यावर परमात्मा कृपेचा वर्षाव करतो, त्याच्या अंत:करणामध्ये स्वत:च्या भेटीची ओढ निर्माण करतो. मग अशा आत्म्यांना जग दु:ख रूपी दिसू लागते. जगाचे खरे स्वरूप त्याच्या लक्षात येते. मग तो आत्मा अशा महात्म्यांच्या शरणी जातो, ज्याने जिवंतपणीच मृत्युवर इलाज शोधलेला असतो. मृत्युपासून ना कोणी जपी बचावलेला आहे, ना कोणी तपी बचावलेला आहे, ना कोणी हटी बचावलेला आहे आणि ना कोणी योगी बचावलेला आहे मृत्युपासून कोणाचीही सुटका झालेली नाही. जे परमात्म्याची भक्ती करीत, सतगुरूंच्या उपदेशानुसार जीवनाची वाटचाल करीत परमात्म्यारूप बनले, तेच या क्रूर मृत्युच्या पंजातून सुटू शकले. गुरु नानकदेवजी सांगतात:

***जन्म मरण दोऊं में नाहीं, जन पर उपकारी आए।***

परमात्म्याचे प्रियजन जन्म–मृत्युच्या पलिकडे असतात. ते परमात्म्याच्या आदेशानुसार या जगात येतात, त्याच्या आदेशाची अंमलबजावणी करतात आणि जेव्हा परमात्मा त्यांना बोलावून घेतो, तेव्हा ते निघून जातात.

महाराज कृपाल सांगत असत, ''तुरुंगामध्ये कैदी कष्ट भोगत असतात व डॉक्टर त्यांची निगा राखण्यासाठी तेथे येतात, परंतु डॉक्टर तेथील कैदी नसून ते स्वतंत्र असतात.'' याचप्रमाणे आपण जीव तनाचे पण रोगी आहोत व मनाचेदेखील रोगी आहोत. आपला आत्मादेखील तना–मनाच्या संगतीत राहून रोगी झालेला आहे. संत–महात्मा मात्र या रोगांपलिकडे गेलेले असतात. ते जगात येतात, येथे राहतात, परंतु येथील रोगांनी मात्र ते ग्रस्त होत नाहीत. येथे सर्वात मोठे रोग काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार आहेत. गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

***साध संग ओह दुष्ट वस होते।***

आपण या पाच दरोडेखोरांपासून विद्या–अभ्यास करून वा धन–संपत्तीच्या मदतीने स्वत:चा बचाव करू शकत नाही. आपले आई–वडीलदेखील आपले या दरोडेखोरांपासून रक्षण करू शकत नाहीत. केवळ खऱ्या साधूंना शरण जाऊनच आपण या दरोडेखोरांपासून स्वत:चे रक्षण करून घेऊ शकतो.

एक खरा जिज्ञासु गुरु अर्जुनदेवजी महाराजजींकडे गेला व त्याने त्यांना विचारले, ''परमात्म्याची भेट आपण कशारितीने घेऊ शकतो? परमात्म्याच्या भेटीचे फायदे काय आहेत? आपण कृपाकरून मला समजावून सांगा.'' या वाणीद्वारे गुरु अर्जुनदेवजी त्या सेवकास परमात्म्याच्या भेटीचा मार्ग तसेच परमात्म्याच्या मिलनाचे फायदे सांगत आहेत. तुमच्या समोर गुरु अर्जुनदेवजींची ही वाणी सादर केली जात आहे, जी काळजीपूर्वक ऐकण्यासारखी आहे:

**किन बिध मिलै गुसाईं मेरे राम राय।।**

जोपर्यंत आत्मा संतांच्या संगतीत जाऊन त्यांनी सांगितलेल्या युक्तीनुसार सुरत–शब्दाचा अभ्यास करीत नाही, तोपर्यंत त्याचा परमात्म्याच्या भेटीचा प्रश्नच उद्भवत नाही. आपणांस ना आपला देश ना आपला धर्म बदलण्याची तसेच आपले घरदार सोडून जंगल–पर्वतांवर जाण्याचीही गरज नाही. ना आपले कान छेदून योगींप्रमाणे मुद्रा परिधान करण्याची ना आपल्या शरीरावर भगवे वा निळी वस्त्रे परिधान करण्याची गरज आहे, ना मुला–बाळांचा त्याग करण्याची गरज आहे, ना पतीने पत्नीचा वा पत्नीने पतीचा त्याग करण्याची गरज आहे. गरज आहे ती स्वमेहनतीने कमाई करून उदरनिर्वाह करण्याची आणि संत–सतगुरू आपणांस जो शब्द–नामाचा अभ्यास करण्यास सांगतात, तो ध्यान–अभ्यास प्रामाणिकपणे करण्याची:

**कोई ऐसा सन्त सहज सुख दाता मोहे मारग देय बताई।**

आपण प्रेमाने सांगता,''मला असे **संत सहज सुख दाता** मिळोत जे मला परमात्म्याच्या घरी जाण्याचा मार्ग दाखवोत कारण सुख आणि शांती नामात आहे. संसारातील सत्तेत वा धन–संपत्तीत सुख–शांती नाही. सोन्याचे नक्षीकाम केलेल्या मंदिरात सुख–शांती नाही, संसारिक विषय–विकारांमध्ये देखील सुख–शांती नाही. शांती केवळ नामात आहे. नाम निव्वळ शब्द नसून ती एक ताकत आहे, जी कणाकणांत व्यापलेली आहे.''

संत नामाचे भंडारी बनून येतात. ते स्वत: नामाचा जप करून नामरूप होऊन जातात. परमात्म्याकडून संत आत्म्यांसाठी अशी वस्तू घेऊन येतात, जी वस्तु आपण ना धन–संपत्तीच्या मदतीने, ना सत्ता–अधिकाराच्या मदतीने खरेदी करू शकतो. संत दाता बनून या जगात येतात. भिक्षूक बनून येत नाहीत. ते दान करीत असलेल्या अनमोल वस्तूचा मोबदला किंवा मुल्य मागत नाहीत, इतकेच काय ते उपकार केल्याचे किंवा मी तुम्हांस एवढी अनमोल वस्तू दिली आहे हे प्रदर्शित देखील करीत नाहीत.

संत परोपकारी असतात. दुसऱ्याचे दु:ख पाहून त्यांचे अंत:करण विदारीत होते, त्यांच्या अंतरात करूणा उत्पन्न होते. ते प्रत्येक आत्म्याच्या दु:खाचे निवारण करण्याचा उपाय करतात. आत्म्याचे खरे हितचिंतक जर कोणी असेल, तर हे महात्मा असतात.

आपणांस सहज समाधी तेव्हाच प्राप्त होते जेव्हा आपण संतांनी दिलेल्या नामाच्या स्मरणाच्या मदतीने आपले इतरत्र पसरलेले लक्ष आपल्या दोन्ही नेत्रांच्या मध्यभागी असलेल्या तिसऱ्या तिळावर एकाग्र करतो. आपली सर्व चेतनशक्ती जेव्हा तिसऱ्या तिळावर एकाग्र होते, स्थुल, सूक्ष्म आणि कारण हे तिन्ही पडदे दूर होतात व आपण अंतर्यात जातो, तेव्हा आपणांस सहज–अवस्था प्राप्त होते. गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात:

***गुरूमुख आए जाए निसंग।***

आपणांस एखादे असे **संत सहज सुख दाता** भेटावेत ज्यांनी आपणांस परमात्म्याच्या घरी जाण्याचा मार्ग दर्शवावा. संत–महात्मा दररोज त्या मार्गाने ये–जा करीत असतात. संत पुस्तकात वाचून वा कुणाकडून ऐकून आपणांस मार्ग दर्शवित नाहीत. ते असेही म्हणत नाहीत की तुम्ही एकटेच अंतर्यात जा, किंबहुना ते सांगतात, ''या, आम्ही तुमच्या सोबत आहोत.''

**अंतर अलख न जाई लखया विच पड़दा हौमें पाई।।**

आपण प्रेमाने सांगता, ''हे जग रोगग्रस्त आहे. या जगामध्ये येऊनही आपणांस सत्याचे ज्ञान नाही आणि परमात्म्याचेही ज्ञान नाही. आपल्या अंतरात अहंकार आणि मोहाचा पडदा आहे. या पडद्यांमुळेच आपण परमात्म्यास पाहू शकत नाही व जगाच्या खऱ्या स्वरूपास समजू शकत नाही.''

आपण प्रेमाने सांगता, ''जमिनीमध्ये सर्व ठिकाणी पाणी आहे. ते कोठे शंभर फुट खोलीवर सापडते तर कोठे त्याहूनही खोलवर जाऊन सापडते. आपण दररोज जमिनीवरून चालतो, परंतु आपण जमिनीखालील पाण्याद्वारे ना काही फायदा करून घेऊ शकतो ना आपली तहान भागवू शकतो.

आपला विश्वास देखील बसत नाही की खरोखरीच जमिनी खाली पाणी आहे का? परंतु आपण जेव्हा ट्युबवेल लावतो किंवा विहीर खणतो, तेव्हा आपणास त्या पाण्याच्या अस्तित्वाचे ज्ञान होते,आपण आपली तहान भागवतो आणि शेतीचे कामदेखील त्या पाण्याच्या सहाय्याने करतो.''

याचप्रमाणे तो अलख परमात्मा आपल्या सर्वांच्या अंतरात आहे, परंतु आपला विश्वास बसत नाही की तो आपल्या अंतरात आहे. आपणांस हे देखील माहित नाही की आपण त्यास कसे भेटू शकतो? ग्रंथी, पंडित, पुजारी रात्रं-दिवस ग्रंथ-पोथ्यांमधून वाचून परमात्म्याचे दोहे लोकांना गाऊन ऐकवित असतात, परंतु ग्रंथ जे करण्यास सांगतात, त्यानुसार ते स्वत: करीत नाहीत. ते कथन करण्याचे काम करतात, परंतु त्यावर स्वत: अंमल मात्र करीत नाहीत, लोकांना सद्वर्तनाचा उपदेश करतात, परंतु स्वत: मात्र रात्रं-दिवस खोटे बोलत असतात. स्वामीजी महाराज सांगतात:

***मैं पूछूँ तुमसे ऐसे, तुम साध कहावत कैसे।***

मी तुम्हांस एक प्रश्न विचारतो की, साधना करून पारब्रह्मामध्ये जाऊन जेथे मनुष्य साधू बनतो, तेथे तर तुम्ही गेला नाहीत, साधना साधली नाही, मग तुम्ही स्वत:स साधू-संत असे कसे बरे म्हणवता? तुम्ही काम, क्रोधाचाही त्याग केलेला नाही. गुरु रामदासजी सांगतात:

***साधना साध जन नीके जिन अंतर नाम धरीजे।***
***परसन परस भए साधु जन जन हर भगवान दखीजे।।***

ज्याने साधना करून अंतरात नाम प्रगट केले व नामरूप बनला आहे, तोच मनुष्य खरा साधू आहे. एखादा असा साधू-संत भेटावा ज्यास भेटून आपणांस परमात्म्याची व गुरूंची आठवण यावी. गुरु नानकदेवजी सांगतात:

***सच्ची बैठक तिन्हां संग जिन संग जपिए नाओ।***
***तिन सतसंग न कीचे नानक जिन्हां अपना स्वाओ।।***

**माया मोह सभो जग सोया ऐह भरम कहो क्यों जाई।।**

आता गुरु अर्जुनदेवजी महाराज प्रश्नकर्त्या जिज्ञासूला उत्तर देत पुढे सांगतात,''सर्व जग मोह-मायेच्या भ्रमात झोपलेले आहे. आपणांस एखाद्या अशा संतांचा शोध नाही जे परमात्मारूप व नामरूप झालेले आहेत. मग आपल्या अंतरातील भ्रम आणि मोहाची मधुर झोप कशी बरे दूर होईल?

## एका संगत इकत गृह बसते मिल बात न करते भाई।।

आता गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात, ''स्त्री-पुरुष एकाच बिछान्यावर निद्रा घेत युगे व्यतीत झाली आहेत, परंतु स्त्रीने ना तिच्या पतीस पाहिले, ना त्याच्याशी मिलन केले, ना ती सौभाग्यवती झाली. त्याचप्रमाणे आत्माही शरीरात आहे व परमात्मादेखील शरीरातच आहे. दोघेही शरीरात एकत्र राहूनही आत्म्याने ना परमात्म्याशी मिलन केले, ना तो सौभाग्यवान झाला.

## एक बस्त बिन पंच दुहेले ओह बस्त अगोचर ठाई।।

आपण सांगत आहात,''आपणांस कल्पना नाही की आपले घर लुटले जात आहे व आपण निद्रावस्थेत आहोत. काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार रात्रं-दिवस आपली पुंजी लुटत आहेत. आपण बाह्यजगात शिकले-सवरलेले आहोत, उत्तम वक्तेही आहोत, परंतु आपल्या लुटल्या जाणाऱ्या पुंजीबद्दल तोपर्यंत आपणांस कल्पना येत नाही, जोपर्यंत आपण परिपूर्ण संत-सतगुरूंनी सांगितलेल्या मार्गावर चालत नाही.'' कबीर साहेब सांगतात:

***पोथी आखे पंडिता मैनूं न फरोल। मेरे वस दी गल्ल नहीं कुंजी सतगुरू कोल।।***

## जिसका गृह तिन दीआ ताला कुंजी गुरू सौंपाई।।

गुरु अर्जुनदेवजी प्रेमाने समजावत आहेत, ''हे बघ प्रिया! ज्या परमात्म्याने हे शरीर निर्माण केले आहे, तो शब्द-रूप धारण करून मोठ्या युक्तीने मजबूत वज्राचे द्वार बंद करून या शरीरात बसलेला आहे व त्या द्वाराची चावी परिपूर्ण महात्मांच्या हाती दिलेली आहे. चावी हाती असलेले महात्मा सदैव या जगात येत असतात, त्यांचा रस्ता कधी बंद होत नाही. परमात्म्यास



दयेचा सागर म्हटले जाते. तो परमात्मा आपल्या आत्म्यांवर सदैव दया करून त्याच्या प्रिय पुत्रांना या जगात पाठवित असतो.'' गुरु रामदासजी महाराजांनी अत्यंत प्रेमाने सांगितले आहे की, ''मनुष्याने विज्ञानात भले कितीही विकास केलेला असो, तो मनुष्य देह बनवू शकत नाही. परमात्म्याने पंच तत्त्वांचा पुतळा, मनुष्य देह बनविला आहे. एक तत्त्व दुसऱ्या तत्त्वाच्या विरोधात्मक असूनही ते एकत्र काम करतात. कोणी चार किंवा सहा तत्त्वांचा मनुष्य बनवू शकत नाही.'' स्वामीजी महाराज सांगतात:

***जीव अचेत न चेते भाई, घर सुख छड़ वन वन भटकाई।***
***जाके घर सुख का भंडारा, सो क्यों भरमे दर दर मारा।।***

जीव निद्रावस्थेत अचेत आहे. सर्व सुखांचे भांडार त्याच्या शरीररूपी घरात असून तो सुखांचा शोध अंतरात घेण्याऐवजी बाहेर वनामध्ये, पर्वतांमध्ये, नद्यां-तीर्थक्षेत्रांमध्ये आणि मंदिर-मशिदींमध्ये घेत आहे.

***राधा स्वामी कहत सुनाई, कर सतसंग बुझ न पाई।***
***सतसंग बिना बूझ न पाई, भाग बड़े सतसंग तब पाई।।***

आपण रात्र-दिवस कितीही तळमळत फिरलो तरी भाग्याशिवाय सत्संग लाभत नाही. संत-महात्मा ज्यास सत्संग म्हणतात, तो सत्संग लाभणे खूप अवघड आहे, कारण आपणांस समजत नाही की संतांच्या वाणीमध्ये सत्संग कशास म्हटले गेले आहे? जगात लोकांच्या मेळाव्यास सत्संग म्हटले जात नाही. जेथे एखादा नामाभ्यासाची कमाई करणारा महात्मा सत्संग करतो, त्यास सत्संग म्हटले जाते. अशा नामाची साधना करणाऱ्या महात्म्यांच्या संगतीत गेल्याने आपला लाभच लाभ होतो.

जेथे एक धर्म दुसऱ्या धर्मास शिव्या देतो, निंदा–नालस्ती करतो किंवा पुरातन राजा–महाराजांच्या कथा जेथे ऐकविल्या जातात, त्यास सत्संग म्हणत नाहीत. महात्म्यांच्या सत्संगामध्ये शब्द–रूप गुरुंचा, शब्द–नामाचा, परम्यात्म्याचा महिमा गायला जातो. तेथे मार्गावरून भटकलेल्या जीवांच्या अंतरात नाम जपण्याची आवड, विरह व तळमळ निर्माण केली जाते.

**अनिक उपाव करे नहीं पावै बिन सतगुर शरणाई।।**

आता आपण प्रेमाने सांगत आहात की,''जोपर्यंत आपण एखाद्या (त्या वज्राच्या द्वाराची) चावी असलेल्या महात्म्यांकडे जाऊन शब्द–नाम प्राप्त करून घेत नाही, तोपर्यंत आपण मन–बुद्धीच्या सहाय्याने जप–तप, पूजा–पाठ, हठ–योग करून आपल्या शरीरास कितीही यातना दिल्या व इतर हवे तेवढे उपाय केले, तरीही आपण शांती प्राप्त करून घेऊ शकत नाही.''

**जिन के बंधन काटे सतगुरु तिन साध संगत लिव लाई।।**

अनेक प्रकारची बंधने असतात, परंतु परमात्मा आपली बंधने तोडतो. लोक–लज्जेचे बंधन आहे, मित्र–मंडळी आपणांस टोमणे मारतात की तू इतका शिकला–सवरलेला असूनही साधू–संतांच्या मागे काय फिरतोस? हे देखील एक बंधन आहे. संतमतात एम.ए. पदवी धारकासही चाळीस दिवसाच्या बालकाप्रमाणे बनावे लागते, कारण ही शिक्षणाची बाब नाही.

महाराज कृपालदेखील खूप शिकलेले होते. ते नेहमी म्हणत असत, ''पुस्तके लिहिणे हे मन–बुद्धीचे काम आहे. परंतु जेथे मन–बुद्धीची कक्षा संपते, तेथूनच परमार्थ मार्गाची सुरुवात होते.'' संत सत्संगाद्वारे आपली बंधने तोडतात. ते आपणांस प्रेमाने समजावतात की आपणांसोबत ना जगाचा मान–मोठेपण ना टोमणे सोबत जाणार आहेत. जग लहान असून परमात्मा खूप मोठा आहे. म्हणून परमात्म्याशी मिलाफ करण्यासाठी, आपल्या घरी सचखण्डास जाण्यासाठी, आपण या जगातील मोठ्यात–मोठे बलिदान देखील लहानच आहे.

**पंच जना मिल मंगल गाया हर नानक भेद न भाई।।**

संगतमध्ये गेल्याने आपण नामात एकरंग होतो. आपले लक्ष परमात्म्याशी एकाग्र होते. आपण सर्वजण परमात्म्याचे गुणगान करतो:

***गोबिंद गोबिंद कहिए दिन राती, गुण गोबिंद शब्द सुणावड़या।।***

आपण सर्व जेव्हा शब्द-नामाची कमाई करतो, तेव्हा आपल्यात आणि परमात्म्यात काहीच फरक राहत नाही, कारण आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे. जेव्हा आत्मा परमात्म्यास मिळतो तेव्हा तोदेखील परमात्मा बनतो. संगतमध्ये गेल्यानेच आपल्या अंतरात नाम जपण्याची आवड, विरह-तळमळ निर्माण होते. सत्संगात गेल्यानेच आपणांस आपल्या चुका कळतात.

**मेरे राम राय इन बिध मिलै गुसाईं।।**
**सहज भया भ्रम खिन मह नाठा मिल जोती जोत समाई।।**

गुरु अर्जुनदेवजींनी या वाणीमध्ये अतिशय प्रेमाने सांगितले आहे की आम्हांस असे **संत सहज सुख दाता** भेटावेत, ज्यांनी आपणांस अंतर्यातील परमात्म्याच्या मार्गावर आणावे व जे वज्रद्वार बंद आहे, ते उघडावे. परमात्मा करूणा करून आपली सर्व बंधने तोडून आपणांस महात्म्यांच्या संगतीमध्ये आणतो. संत-महात्मा आपली सामाजिक बंधने तोडून आपणांस समजावतात की जग लहान असून परमात्मा मोठा आहे.

प्रियजनहो! तुम्हांस ना घरदार, ना मुले-बाळे त्यागण्याची गरज आहे, तुम्हांस केवळ अशा महात्म्यांच्या सहवासाची-संगतीची गरज आहे, जेथे जाऊन आपण परमात्म्याची भक्ती, परमात्म्याचे स्मरण करू शकू. परमात्मा आपल्या शरीरात असून आपण त्यास अंतर्यातच भेटू शकतो. आजपर्यंत परमात्मा ना कोणास बाह्यजगात भेटला आहे, ना भेटू शकेल.

***

# शिस्त

परम संत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींना संदेश,
सन्त बानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – ६ एप्रिल १९८७

मी त्या महान गुरूंचे आभार मानतो ज्यांनी अपार दया करून त्यांच्या आठवणीत बसण्याची आपणांस संधी दिली. आपण सर्वजण आपआपल्या घरादारांच्या अवजड साखळदंडांची बंधने सैल करून परमात्मारूपी सावन–कृपालजींच्या आठवणीत बसलात. परंतु सत्य आहे की आपण स्वत:हून त्यांच्या आठवणीत बसू शकत नाही, तसे करण्याची शक्ती आपणांमध्ये नाही, ही केवळ त्या महान आत्म्यांची दया आहे.

काल सत्संगात सांगितले गेले होते की, सतगुरूंच्या प्राप्तीशिवाय आपल्या अंतरात प्रेम जागृत होत नाही. आपले प्रेम निद्रावस्थेत आहे. ते आपल्यावर सदैव प्रेम करीत असतात, परंतु प्रश्न आपल्या समजण्याचा असतो कि त्यांच्या प्रेमाची व सहानुभूतीची आपणांस जाणीव आहे का? काय आपण त्या प्रेमापासून व सहानुभूतीपासून लाभ घेऊ शकतो का?

कबीर साहेब सांगतात, वृक्ष कधीच स्वत:च्या फायद्यासाठी जन्म घेत नाही. त्याचा जन्म जगास फळे अर्पण करण्यासाठी होतो. वृक्षास कोणी दगड किंवा सोटा मारला तरीही वृक्ष त्यास खाण्यासाठी मधुर फळच देतो. याच प्रमाणे नदी स्वत:साठी नाही तर जगाच्या हितासाठी वाहत असते. पशु–पक्षी, मानव नदीचे पाणी पितात, त्या पाण्याचा वापर करून अन्न उगवतात. याच प्रमाणे पर्जन्यवृष्टीदेखील जगाच्या कल्याणासाठीच होत असते. संतदेखील या जगात जनकल्याणासाठीच येतात. त्यांनी स्वत:चा उद्धार कायम करून घेतलेला असतो. ते स्वत:च्या गरजेपोटी या जगात येत नाहीत. परमात्माने त्यांना मार्गावरून भटकलेल्या आत्म्यांना समजावून माघारी आणण्याची जबाबदारी दिलेली असते. संतांची कृपा करण्याची आपआपली पद्धत असते.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''संतांकडे शिकविण्याच्या अनेक पद्धती असतात. ज्या रितीने एखादा भक्त भक्तीमार्गावर चालू लागतो, त्या पद्धतीनेच संत त्यास प्रेमाने भक्तीमध्ये लीन करून घेतात.'' सत्संगामध्ये महाराज सावन एक खास गोष्ट सांगत असत की,''जे लोक असे म्हणतात की सत्संगास आम्ही जातो, ते लोक अंध आहेत. जेव्हा त्यांचे आंतरिक नेत्र उघडतात, तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, आपण स्वत:हून सत्संगास जात नसून कोणी तरी आपणांस खेचून नेतो. आपण म्हणतो, आम्ही तास-दोन तास ध्यान-अभ्यासात बसतो. परंतु आपले जेव्हा आंतरिक नेत्र उघडतात, तेव्हा सत्य आपल्या लक्षात येते की आपण स्वत:हून बसतो की कोणीतरी आपणांस बसवितो.''

मी सर्व जगात ठामपणे हे सांगितले आहे की गुरूमत, संतमत हे काही पऱ्यांच्या गोष्टीप्रमाणे काल्पनिक नसून, ते एक सत्य आहे. आजपर्यंत ज्यांनी नामाची कमाई केली, सतगुरूंच्या मार्गदर्शनानुसार स्वत:चे आयुष्य घडविले, अंतर्यात जाऊन स्वत:च्या नेत्रांनी सत्य पाहिले, ते कधीही असे म्हणू शकले नाहीत की हे पऱ्यांच्या गोष्टीप्रमाणे काल्पनिक आहे. त्यांनी इतरांना हे सत्य सांगितले की, आपल्या अंतर्यात जे काही आहे त्याचा महिमा अपरंपार असून त्याचे शब्दांमध्ये वर्णन केले जाऊ शकत नाही. खरेतर जे अंतर्यात जातात, त्यांची जिव्हा मुक होते, त्यांच्या नेत्रांमध्ये संतोष प्रकटतो आणि त्यांचा आत्मा प्रेमाने सद्‌गदीत होतो. अशाचतऱ्हेने त्यांनी आपल्यावर कृपेचा वर्षाव केला व आपणांस प्रेमाची देणगी दिली.

महाराज सावन सिंहजी अतिशय स्फोटक शब्दांमध्ये सांगत, ''प्रियजनहो! सत्संगी जर दृढमार्गी असेल, नियमित सत्संगास जात असेल व सतगुरूदेखील दृढ विचारी असतील व त्यांनी जर निश्चय केलेला असेल की मी या प्रेमीस या जन्मानंतर पुर्नजन्म देणार नाही, तर ज्याप्रमाणे विमान प्रवाशांना घेऊन आकाशात अलगद उडते, त्याप्रमाणे ते त्यास सचखण्डास घेऊन जातात.''

परंतु काळ एक अशी शक्ती आहे, ज्याची इच्छा असते की कोणत्याही परिस्थितीत जीव त्याच्या बंधनातून मुक्त होऊ नये. काळ संतांच्या आत्म्यास कोणतीही शिक्षा करू शकत नाही, त्यास जन्ममरणाच्या दु:खामध्ये अडकवू शकत नाही, कारण त्या आत्म्याच्या शिरावर पूर्ण सतगुरूंचे छत्र असते. परंतु त्या आत्म्यास काळ तन-मनाच्या पिंजऱ्यात अडकवून त्याच्यासमोर निरनिराळ्या अडचणी निर्माण करतो. त्यामुळे मग आपण काळाच्या इच्छेनुसार वागू लागतो. परंतु तरीही काळाचे डावपेच यशस्वी झाले नाहीत, तर तो सत्संगींच्या मनामध्ये प्रवेश करतो. मन सत्संगींना एकमेकांपासून दूर नेते. तुम्हांस कल्पना आहे सत्संगामध्ये एकमेकांप्रती प्रेम-आपुलकी नसेल तर अंतरामध्ये श्रद्धा कशी बरी निर्माण होईल?

सतगुरूंचे कर्तव्य असते की दूर वा जवळ कितीही आत्मे असोत, त्यांना नामाशी जोडावे, नामाची कमाई करण्यासाठी मार्गदर्शन करावे, त्यांना आपले प्रेम देऊन त्यांच्यात प्रभूप्रेम निर्माण करावे. ही सतगुरूंची जबाबदारी असते, ज्याचे आकलन करून घेणे सत्संगींचे देखील कर्तव्य असते. ज्याप्रमाणे एका बापाची अनेक मुले असतात. काही मुले स्वत:ची जबाबदारी समजतात की आपले वडील जो काही उद्योग करतात, मी देखील त्या उद्योगात हातभार लावावा व जबाबदारीने तो उद्योग पुढे वाढवावा. याचप्रमाणे जर संतांच्या सत्संगींनी समजून घेतले की कशा तऱ्हेने सतगुरू आपल्या उद्धारासाठी प्रयत्नशील आहेत, तर सत्संगी दृढ निश्चयी होऊन आपआपसांमध्ये प्रेम-आपुलकीचे वातावरण बनवतील. सत्संगींसाठी परमार्थामध्ये यशस्वी होण्यासाठी **शिस्त** अत्यंत महत्वाची असते.

बाबा जयमल सिंहजी महाराज, सावन सिंहजी महाराज आणि महाराज कृपाल सिंहजी सैन्यात नोकरीसाठी गेले होते. तसेच या गरीब आत्मासदेखील सैन्यामध्ये जाण्याची संधी लाभली. सैन्यामध्ये आदेशाचे पालन करण्याची सवय लावली जाते.

मी नेहमी सांगत असतो की सैन्यामध्ये असे आदेश दिले जातात की स्वयंपाक तयार करा. लाकडे आणि स्वयंपाकाचे साहित्य कोठे मिळेल याची चौकशी नंतर करा, प्रथम स्वयंपाक करा. नंतर विचार करा की आपल्याकडे कोणत्या वस्तूची कमतरता आहे? येथूनच मला सवय लागली की आदेशाचे पालन करणे किती महत्त्वाचे आहे! आपण संसारिक लोकांना खुश करण्यासाठी त्यांच्या आदेशाचे पालन करतो, रात्र-रात्र जागरण करतो, मेहनत करतो, परंतु सतगुरूंचा आदेश आपण कमी दर्जाचा मानतो. एखादा भाग्यवंत आत्माच त्यांच्या आदेशाचे पालन करतो. नाहीतर आपण वारंवार तक्रारीच करतो. तुम्ही पाहा! सैन्यातील लोक एकमेकांच्या पाठोपाठ कसे शिस्तीत जातात, आपले कानदेखील खाजवित नाहीत.

महाराज कृपाल सांगत असत,''परमात्मा मनुष्याच्या शोधात असतो, परंतु कोणी मनुष्य बनावे.'' तुम्ही मनुष्य बनून पाहा! परमेश्वर मनुष्याच्या मागे-मागे फिरत असतो. बाबा सावन सिंहजींना महाराज जयमल सिंहजींनी शोधले तसेच महाराज कृपाल सिंहजींना बाबा सावन सिंहजींनी शोधले. मी स्वत: जमिनीखाली बसलो होतो, मला कोण ओळखत होते? त्या विश्वेश्वर कर्तेकरविते महाराज कृपालजींनी माझ्या घरी येऊन माझा शोध घेतला. महाराज कृपाल म्हणाले,''प्रिय शिष्या! तू हे काम इथे बसून कर, मी स्वत: तुझ्याकडे येईन.'' संत जे काही सांगतात, ते सत्यच सांगतात.

मी नेहमी सांगतो की जगभर मी हेच सांगत फिरलो माझे स्वत:चे काही कार्य नसून ते सावन-कृपालजींचे कार्य आहे. मी आयुष्यभर प्रेमाचा पुजारी राहीलो व माझे गुरूदेव प्रेमाचा सागर होते. मला प्रेमाची देणगी मिळाली आहे व ते प्रेमच वाटण्यासाठी तुमच्याकडे मी आलेलो आहे.

संत येऊन आपल्या अंतरात प्रेम निर्माण करतात, परंतु आपले मन अंतरातून सत्संगींमध्ये फूट पाडते. काळाकडे अनेक प्रकारचे डावपेच आहेत. आपण जेव्हा एकमेकांची निंदा-नालस्ती करतो, तेव्हा तेथे ध्यान-अभ्यास

कोठून राहणार? स्वामीजी महाराज सांगतात,''सतगुरू रागावतात, सत्संगी रूदन करतात.'' आपण सत्संगीमध्ये आपआपसांत अधिकाधिक प्रेमभाव असावयास हवा; कारण आपण एखाद्या समाजाप्रमाणे नसतो, तर त्याहून वरच्या पातळीवर असतो. समाजांमध्ये आपणांस असे सांगितले जात नाही की कुणाची निंदा करणे वा कुणाचा तिरस्कार करणे वाईट आहे. हा संतांचा उपदेश आहे की सर्वजण एकत्र या. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

***होय एकत्र मिलो मेरे भाई दुविधा दूर करो लिव लाई।***
***हर नामें की होवो जोड़ी गुरमुख बैठो सफा बिछाई।।***

हुजूर कृपालजींनी जगातील प्रत्येक मनुष्यास परमात्म्याच्या भक्तीत एकत्र बसण्यास सांगितले. हा सत्संग मी संतबानी आश्रम, अमेरिका येथे देखील केला होता की, कशातऱ्हेने काळ सत्संगींना सतावतो, त्यांचे ध्यान–नामस्मरण लुटतो. आपले ध्यान–नामस्मरण बाजूला राहते व आपण एकमेकांची निंदा–नालस्ती, टीका करू लागतो. संत आपणांस शिकवितात की तुम्ही एकमेकांवर प्रेम करा, सर्वजण एकत्र येऊन बसा, त्यातच तुमचा फायदा आहे. तुम्ही करून पाहा! संत जे काही उपदेश देतात, त्या आदेशांचे त्यांनी स्वत: पालन केलेले असते. **शिस्त** अतिशय गरजेची आहे.

माझ्यासोबत गेले पंचवीस–तीस वर्षे राहणारे अनेक लोक आहेत, परंतु त्यांपैकी एकही जण हात वर करून असे बोलू शकणार नाही की मी कधी जेवणास नाव ठेवले वा खूप उशिरापर्यंत झोपून राहीलो किंवा सकाळी मला निद्रावस्थेत कोणी पाहिले असेल किंवा माझ्या मुलीने माझे अंथरूण आवरले असेल, कारण मी शिस्तप्रिय आहे. सैन्यामध्ये आम्हांस शिकवले जाई की सकाळी उठून स्वत:च्या अंथरूणाच्या घड्या स्वत:च घालाव्यात. सैन्यामध्ये आदेश होता की शहरामध्ये जाताना सोबत पास घेऊन जाणे.

मी येथे शेतामध्ये एका बाजूस बसून ध्यान–अभ्यास करीत असे. माझ्या हृदयामध्ये विचार आला की या जगामध्ये आपण वरिष्ठांच्या आदेशाचे पालन

करतो. मग आपल्या सतगुरूंचा आदेश एखाद्या साधारण वरिष्ठाच्या आदेशा इतकाही महत्त्वाचा नाही का? आपण विचार करतो की सतगुरू इतरत्र कोठेतरी बसलेले आहेत. परंतु असे नाही. सतगुरू आपल्या समीप आपल्या अंतरामध्ये वसत आहेत. तुम्ही स्वत:स **शिस्तीची** सवय लावा. घराचा पाया पक्का असेल तर घर व्यवस्थीत उभे राहील. त्याचप्रमाणे **शिस्त** नसल्यास आपण कशी बरे पुढे प्रगती करू?

गुरू गोविंद सिंहजी जेव्हा रोपड़ येथे गेले तेव्हा त्यांनी तेथील लोकांना शिस्तीसंबंधी शिकविले की जीवनात उन्नती करण्यासाठी तुमच्याकडे कोणता मार्ग आहे? तुम्ही काय कामकाज करता? त्यासर्वांनी सांगितले की, ''आम्ही चोरी करतो, दरोडे घालतो.'' गुरू गोविंद सिंहजींनी विचारले, ''प्रियजनहो! तुम्ही या कर्मांची परतफेड कशी कराल?'' ते म्हणाले की,''आम्ही शिकलो-सवरलेलो नाहीत, आम्ही कर्मांचा हिशोब कसा बरे ठेवणार?'' गुरू गोविंद सिंहजी म्हणाले,''तुम्ही असे करा की तुमच्या हातून जेव्हा पाप होईल तेव्हा तुम्ही एक दगड एका बाजूस ठेवत जा आणि संध्याकाळी ते मोजा की तुम्ही किती पापे केलीत? किती वेळा कोणाचे वाईट केलेत?''

अशा रीतीने एके दिवशी केले असता सर्वांचे मोठ-मोठे ढिगच्या-ढिग तयार झाले. सर्वांनी एकत्र बसून विचारविनिमय केला की आपण एवढ्या पापांची परतफेड कशी करू? एका समजूतदार माणसाने सल्ला दिला की पाप कर्मे करणे तुम्ही सोडून द्या. त्याप्रमाणे सर्वांनी पापकर्मांचा त्याग केला. काही दिवसांनी गुरू गोविंद सिंहजी महाराजांनी पुन्हा तेथे सत्संगाचे आयोजन केले व त्यांना विचारले कि,''मी तुम्हा लोकांना शिकवण दिली होती, त्याप्रमाणे तुम्ही हिशोब केला?'' लोक म्हणाले,''होय! एक दिवस हिशोब केला असता दगडांचे मोठ-मोठे ढिग तयार झाले. आम्ही सर्वांनी पंचायतीमध्ये एकत्र बसून निर्णय घेतला की आपण ना पापं करावीत ना त्यांची परतफेड करण्याची आपल्यावर वेळ येईल.''

आपले गुरू महाराज कृपालजींनी निराळ्या पद्धतीने आपणांस समजावले, आपण डायरीमध्ये नोंद करण्यास सांगितले. आम्ही पश्चिमेस प्रत्येक व्यक्तीस डायरी देतो. त्या डायरीतील रकान्यांमध्ये ते दररोज जे काही करतात, त्यांची नोंद ते ठेवतात. परंतु आमच्या प्रांतात जास्त करून लोकं अशिक्षित आहेत. जर त्यांना डायरी दिली तर ते लोक डायरी न भरता ती एखाद्या उंच ठिकाणी देवाऱ्यात ठेवून डायरीपुढे तुपाचा दिवा पेटवतात. त्यांना जेव्हा डायरी ठेवता का असे विचारतो तेव्हा ते सांगतात की होय! डायरी खूप सांभाळून ठेवली आहे. पश्चिमेतील प्रत्येक प्रेमीस डायरी दिली जाते. त्याने जरी त्या डायरीत काही माहीती लिहिली नाही तरीही त्यास सांगितले जाते की तू रिकामी डायरी पाठवून दे. तेव्हा त्याचे मन अंतरातून लज्जीत होते की गुरू माझ्यासाठी एवढी मेहनत करीत आहेत व मी डायरीदेखील भरू नये!

मी जेव्हा संतवाणी आश्रम, अमेरिका येथे गेलो तेव्हा तेथे प्रेमींना प्रश्न विचारला की महाराजजींनी संगतला लिहिण्यासाठी डायरी दिली, लोकांच्या जीवनाचा उद्धार केला. याबाबतीत तुमचे काय म्हणणे आहे? मी त्यांना प्रेमाने सांगितले की अनेक प्रेमींची डायरी मी पाहतो, तेव्हा लक्षात येते की बरेचसे प्रेमी तीच-तीच चूक रोज-रोज करतात. मी नेहमी सांगतो आयुष्यातील आपली एकच चूक आपले आयुष्य निरस करण्यासाठी पुरेशी असते. ते कसे बरे हाथ असावेत, जे रोज-रोज त्याच चुका लिहून महिन्या अखेरीस डायरी पाठवितात. मी हेच सांगत असतो की तुमच्या हातून आज जे कुकर्म झाले ते कर्म पुन्हा होऊ नये. तुम्ही अंतःकरणापासून ध्यान-नामस्मरण करा.

संत आम्हांवर प्रेम करतात. आपले देखील कर्तव्य आहे की त्यांचे प्रेम मिळवावे, त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालावे, त्यामध्येच आपले हित आहे. संतांची इच्छा नसते की आत्मे रूदन करीत येथेच राहावेत. संतांचे कार्य हेच असते की त्यांच्या जीवनकाळामध्येच अधिकाधिक प्रेमींनी ध्यान-अभ्यासामध्ये प्रगती करावी, त्यांच्या अंतरामध्ये शब्दाची धार प्रगट व्हावी.

त्याच व्यक्तीस शिक्षक म्हटले जाते. त्याचे जास्तीत जास्त विद्यार्थी उत्तीर्ण होतात. ज्याचे विद्यार्थी उत्तीर्ण होत नाहीत, त्यास आपण शिक्षक कसे बरे म्हणू? संतांचेदेखील हेच कार्य असते की माझ्या जीवनकाळातच माझी मुले माझ्या शिकवणुकीनुसार सचखंडात पोहचावेत. परंतु आपण आळशी आहोत. आपण **शिस्तीत** राहत नाही, उपदेश ऐकून विसरून जातो. विश्वकर्त्या सावन–कृपालजींनी त्यांच्या आठवणीत बसण्याची आपणांस संधी दिली आहे. त्यांच्या आठवणींमध्ये आपण आपली घरगुती बंधने सैल करून येथे येऊन बसलो आहोत. आता आपले कर्तव्य आहे की आपण जे काही येथे ऐकले आहे, त्यानुसार अंमलबजावणी करावी, आपले ध्यान–अभ्यास, नामस्मरण करावे आणि आपल्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. एकमेकांवर प्रेम करीत आदरभावाने या जगामध्ये राहावे.

सत्संगींच्या अंतरामधून नामाचा व प्रेमाचा सुगंध बाहेर पडावा, जेणेकरून आपल्या शेजारपाजाऱ्यांनी आपले अनुकरण करावे. त्यांना जाणीव व्हावी की हा अमुक संतांचा सेवक आहे. महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''प्रियजनहो! गुरू स्वत: आपला उदो–उदो करीत नाहीत. तर त्यांचे शिष्य त्यांचा उदो–उदो करतात.'' गुरू नेहमी सांगत असतात की त्यांची इज्ज़त, त्यांच्या शिष्यांच्या हातात आहे. सतपुरुष स्वत: पवित्र असतात, तसेच ते त्यांच्या शिष्यांकडूनही हीच अपेक्षा करतात की शिष्यदेखील पवित्र व्हावेत. कारण शिष्य जेवढे पवित्र होतील, तेवढे त्यांच्या अंतरामध्ये प्रेमभाव असेल, तेवढीच सतगुरूंची वाहवा होईल. एक म्हण आहे:

***माड़ा कुत्ता खसमें गाली।***

आपले सतगुरू महाराज कृपाल सांगत की सत्याचे बीज कधी नाश पावत नाही. तुम्ही असा विचार करू नये की संगतमध्ये कोणीच नामाची कमाई करणारे नाहीत किंवा **शिस्तीत** राहात नाहीत. कमाई करणारे आणि **शिस्तीत** राहणारे अनेकजण आहेत. ते तुमच्या बघण्यामध्ये देखील असतात.

आपले सत्याचे शिरोमणी महाराज कृपाल जेव्हा शरीर त्यागून त्यांच्या घरी सचखण्डास गेले तेव्हा किती प्रकारची ढोंगं रचली गेली व काय-काय निकृष्ट घटना घडल्या? जग न्यायालयात गेले, जणू काही महाराजजींना समज नव्हता की ते घर बांधून घरास वाऱ्यावर सोडून गेले? सर्वजण असेच म्हणाले की ते निघून गेले आहेत. कोणी म्हणाले, ते मरण पावले आहेत. आपण जर आपल्या सतगुरूंना सजीव समजलो तर आपण आपआपसांमध्ये भांडलो असतो काय? परंतु त्यांच्यापैकी एकजणाने असेही वास्तव निर्माण केले, ज्याने त्याचा हात वर करून म्हटले, ''जे लोक असे म्हणतात की गुरू मरण पावले आहेत, तर त्यांना कोर्टामध्ये उभे करा, त्यांच्यावर खटला भरा की त्यांनी मरण पावणारे गुरू का धारण केले?'' सतगुरू जन्म घेतात ना मरण पावतात. शब्दरूपी परमात्म्याने ज्या शरीराच्या भाग्यामध्ये लिहिलेले असते, त्या शरीरामध्ये सतगुरू प्रगटतात.

संत कोणासही आपल्या शरीराशी जोडत नाहीत, तर ते आपणांस शब्दासोबत जोडतात. संत कधी म्हणत नाहीत की ते आपले गुरू आहेत. आपले खरे गुरू शब्द-नाम आहे. शब्द अविनाशी आहे. शब्द ना जन्मतो ना मरण पावतो. शब्द स्थावर आहे. आपण जर ध्यान-अभ्यासाची कमाई केली तर वाट चुकू शकतो काय? कबीर साहेब सांगतात:

***गुरु करया है देह का सतगुरू चीन्हा नाहे।***
***लख चौरासी धार में फिर फिर गोता खाहे।।***

आपण आपल्या देहापासून देखील आपली सुटका करून घ्यायची आहे. संतांच्या अंतरामध्ये कार्यरत असलेल्या वस्तूस आपण पकडावयाचे आहे. मी नेहमी सांगतो कि, सतगुरू शब्दाने धारण केलेल्या देह स्वरूपात असतात, सतलोकातून येऊन तो शब्द सतगुरूंच्या अंतरात प्रगट होतो. परमात्मा प्रेम असून संत प्रेमरूप असतात. सावन सतगुरु म्हणाले होते की जर आपल्याकडून ध्यान-अभ्यास होत नसेल, मनाशी संघर्ष होत नसेल तर आपण संतांशी

प्रेम तरी करा. कारण अंतसमयी आपले लक्ष तिथेच लागेल जिथे आपले प्रेम असते.जर संतांशी प्रेम असले तर अंतसमयी त्यांचेच रूप नजरेसमोर येईल.

आपण जर एखादी गोष्ट समुद्राच्या लाटेच्या सुपुर्द केली तर ती समुद्राच्या तळाशी जाऊन बसते. संत आपणांस तेथेच घेऊन जातील, जिथून ते स्वत: आलेले असतात. संत शब्दातून आलेले असतात व शब्दातच जाऊन सामावतात. आपण सर्वांनी जे काही इथे ऐकले आहे त्यावर अमल केला पाहिजे, ध्यान-अभ्यास केला पाहिजे आणि आपले जीवन शांतमय रित्या व्यतीत केले पाहिजे.

***

# धन्य अजायब

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या मधुर आठवणीतील
सन्तबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रमांची माहीती

गुरुप्रिय साधूसंगत,

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या कृपेने दरवर्षीप्रमाणे **सन्तबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथे सत्संगाचे कार्यक्रम** निम्नलिखित दिवशी होतील. सर्व प्रेमी बंधु-भगिनींच्या चरणी नम्र विनंती आहे की, कार्यक्रमात सहभागी होऊन आश्रमातील शांत वातावरणात नामस्मरणाचा आणि संत-वचनांचा लाभ घ्यावा.

**३१ जुलै ते २ ऑगस्ट २०१५**
**७ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर २०१५**
**२३ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर २०१५**
**२७ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०१५**
**२३ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०१५**

***